पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक ७

**सभावृत्तांत**

दिनांक - ६/०९/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ६/०९/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा.शितोळे शैलजा बाबुराव
७) मा.काळजे नितीन प्रताप
८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
९) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.पाटील,मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.गावडे – नगरसचिव, मा.दुधेकर, मा.बरशेट्टी, मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे – कार्य.अभियंता, मा.चव्हाण – आरोग्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

.उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र. २१) पिंपरी चिंचवड रेल्वे स्टेशन परिसरात/नागरिकांना सुरक्षीत रस्ता ओलांडणेसाठी सुविधा तयार करणेबाबत..

विषय क्र.२२) क प्रभागात दापोडी परिसरातील रस्त्यावर व चौकामध्ये वाहतुक सुधारणा विषयक कामे करणेबाबत..

विषय क्र.२३) देहु आळंदी रस्ता साखळी ८/२५० ते १५/२५० ३० मी.डी.पी.प्रमाणे उर्वरीत कामे करणेबाबत.

विषय क्र.२४) क प्रभाग मनपाभवन कार्यक्षेत्रातील प्र.क्र. ३७ महात्मा फुले नगर, बालाजीनगर मधील स्ट्रीटलाईट पोल बदलणेबाबत.

विषय क्र.२५) पांजरपोळ येथे नव्याने बांधावयाच्या टाकीचे प्रशासकीय मान्यतेबाबत..मा.वैशाली काळभोर,मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र. २६) सांगवी येथील ऐतिहासिक उद्यानात उर्वरीत कामे करणेबाबत..मा.प्रशांत शितोळे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव..

ठराव क्रमांक : ४८ विषय क्रमांक : १

दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – प्रशासन

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/८११/२०१३,दि.२१/६/२०१३

विषय : श्री. प्रमोद भीमराव भोसले यांना मुख्यलेखापाल पदावर प्रतिनियुक्तीने केलेल्या नियुक्तीस मुदतवाढ मिळणेबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४९ विषय क्रमांक : २

दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – वाहतुक नियोजन

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.साधना जाधव

संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र. वाहतुक/स्था/१/कावि/३२/२०१३,दि.७/८/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार ब प्रभागात पिंपरी रेल्वे स्टेशन ते मुंबई-पुणे हायवे वरील फिनोलेक्स कंपनी चौक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत ४.०० मी.रुंदीचा फुटपाथ करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५० विषय क्रमांक : ३

दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – वाहतुक नियोजन

सुचक : मा. नितीन काळजे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.वाहतुक/स्था/१/कावि/३१/२०१३,दि.७/८/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार कृष्णानगर, देहू आळंदी रस्ता परिसरात व इतर चौकामध्ये व रस्त्यांची वाहतूक सुधारणा विषयक कामे करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५१ विषय क्रमांक : ४

दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – वाहतुक नियोजन

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.वाहतुक/स्था/१/कावि/३५/२०१३,दि.७/८/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार अ प्रभाग कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील शाळा, हॉस्पिटल परिसरात विद्यार्थ्यांना, नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलांडणेच्या

सुविधा तयार करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५२ विषय क्रमांक : ५
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – वाहतुक नियोजन कक्ष
सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.वाहतुक/स्था/१/कावि/३४/२०१३,दि.७/८/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार यमुनानगर, प्राधिकरण परिसरात व इतर चौकामध्ये व रस्त्यांची वाहतूक सुधारणा विषयक कामे करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५३ विषय क्रमांक : ६
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – वाहतुक नियोजन कक्ष
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा. नितीन काळजे
संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.वाहतुक/स्था/१/कावि/३३/२०१३,दि.७/८/२०१३

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार ब प्रभाग कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील शाळा, परिसरात विद्यार्थ्यांना, नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलांडणेच्या सुविधा तयार करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५४ विषय क्रमांक : ७
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – वाहतुक नियोजन कक्ष
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा. सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.वाहतुक/स्था/१/कावि/३०/२०१३,दि.७/८/२०१३

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार क प्रभागात दापोडी रेल्वे स्टेशन ते मुंबई - पुणे हायवे पर्यंत ४ मी. रुंदीचा फुटपाथ करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५५ विषय क्रमांक : ८

दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – वाहतुक नियोजन कक्ष

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा. सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.वाहतुक/स्था/१/कावि/२९/२०१३,दि.७/८/२०१३

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार ड प्रभागात काळेवाडी रहाटणी परिसरातील रस्त्यावर व चौकामध्ये वाहतूक सुधारणा विषयक कामे करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५६ विषय क्रमांक : ९

दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा. निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१०/कावि/६७५/२०१३,दि.१६/८/२०१३

कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रामधील प्रक्रिया केलेले पाणी CME येथे पुरविण्याबाबत.. विषय क्र.९ कामी मा.महापालिका सभेने मंजुरी दिली असल्यामुळे सदरचे विषयपत्र मागे घेणेची मागणी विभाग प्रमुखांनी केली असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५७ विषय क्रमांक : १०

दिनांक : ०६/०९/२०१३

सुचक : मा.नितीन काळजे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.अप्र/स्था/३/१४९२/२०१३,दि.१३/८/२०१३

विषय : निगडी येथील गुरुदत्त उद्यानाचे नुतनीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५८ विषय क्रमांक : ११

दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बसु/५६/२०१३,दि.२५/७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब मुख्यालयाकडील विषयपत्रानुसार मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये नुतनीकरण करणेच्या कामाचे सुधारित वाढीव अं.र.रु.२१,९९,२०६/- (अक्षरी र.रु.एकवीस लाख नव्याण्णव हजार दोनशे सहा फक्त ) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५९ विषय क्रमांक : १२
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/५९७/२०१३,दि.२२/८/२०१३

विषय : जुन्या मुंबई – पुणे रस्त्यावरील भक्ती शक्ती चौक येथे बस टर्मिनल विकसीत करणेबाबत..

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६० विषय क्रमांक : १३
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – ब प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बप्र/३/कावि/१५०/२०१३,दि.१९/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभाग स्थापत्य विभागाकडील विषयपत्रानुसार प्रभाग क्र.१९ (वॉ.क्र.५९) मधील वाल्हेकरवाडी विवेकानंद कॉलनी मधील रस्ते खडीमुरुमाचे व बी.बी.एम.करणेचे काम निविदा र.रु.१८,६६,६६६/- निविदा क्र.२/७२-२०१२/१३ अन्वये मे.ए.डी.देवकर यांना मिळालेले असून सदर कामाचा भाग हा ग्रीन झोन व लाल व निळया पुररेषेने बाधीत क्षेत्रातील असल्याने सदर कामामधून प्रभाग क्र.१९ वाल्हेकरवाडी मधील ठिकठिकाणचे रस्ते खडी मुरुमाचे करणे व रस्त्यांची बी.बी.एम.पध्दतीने दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६१ विषय क्रमांक : १४
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – क प्रभाग विद्युत
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.कप्र/वि/जा/६९७/२०१३,दि.२२/८/२०१३

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क प्रभाग विद्युत विभागाकडील विषयपत्रानुसार भांडार विभागात साहित्य उपलब्ध नसल्याने भोसरी विभागातील दिवाबत्तीची देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामात अडचणी निर्माण होत आहेत. सदर देखभाल व दुरुस्तीचे काम व्यवस्थित होणेसाठी निविदा नोटीस क्र.११/२६-१२/१३ मधील कामाअंतर्गत असलेल्या परिमाणांमधून टी-५ (४ x २४ वट नळया), ७०/१५० वॅट सोडियम बल्ब, सोडियम चोक, केबल व अनुषंगिक विद्युत विषयक देखभाल दुरुस्ती साहित्य प्रभाग क्र.३२ ते ३५ मध्ये वापरणेस ( Chang of site ) परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६२ विषय क्रमांक : १५
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक : मा.नितीन काळजे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/६०३/२०१३,दि.२६/८/२०१३

विषय : औंध रावेत रस्त्यावरील मुक्ताई चौक येथे बस टर्मिनल विकसीत करणेबाबत..

विषय क्र.१५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६३ विषय क्रमांक : १६
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/कप्र/८२५/२०१३,दि.२२/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे स्थापत्य विभागाकडील विषयपत्रानुसार क प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणे कामी (सुधारित प्रशासकीय मान्यता) येणारे र.रु.२२,५३,१८६/- ( अक्षरी र.रु.बावीस लाख त्रेपन्न हजार एकशे शहाऐंशी फक्त) खर्चाचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६४ विषय क्रमांक : १७
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सशअ/३१५/२०१३,दि.२७/८/२०१३

विषय : पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक व कला धोरणाबाबत..

विषय क्र. १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६५ विषय क्रमांक : १८
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – ब मुख्यालय
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.साधना जाधव
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बमु/६२/२०१३,दि.१/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये दुस-या मजल्यावरील शिक्षण मंडळ विभागाची बैठक व्यवस्था करणे व जुन्या जी.बी.हॉल मध्ये महिला कक्ष व विविध समित्यांची दालने व बैठक व्यवस्था करणेकामीचे र.रु.३०,००,०००/- ( अक्षरी र.रु.तीस लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६६ विषय क्रमांक : १९
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – नगरसचिव
सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नस/२/कावि/४०३/२०१३,दि.२८/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चीन या देशातील शांग्यांग शहर व पिंपरी चिंचवड शहर यांचेमध्ये उद्योग, व्यापार, तंत्रज्ञान, संस्कृती, आरोग्य याबाबत विचारांचे आदान-प्रदान करुन दोन्ही शहरांचा विकास करण्याच्या उद्येशाने सिस्टर सिटी (Sister City) चा प्रस्ताव महापालिकेस देण्यात आला असून सदर सिस्टर सिटीबाबत सहकार्य करार करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६७ विषय क्रमांक : २०
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – ब प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बप्र/१३/कावि/१९/२०१३,दि.२०/७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभाग स्थापत्य विभागाकडील विषयपत्रानुसार वायसीएम रुग्णालयाची स्थापत्य विषयक विविध दुरुस्ती व सुधारणेची कामे करणेकामी येणारे र.रु.३०,००,०००/- (अक्षरी र.रु.तीस लाख फक्त) चे पुर्वगणनापत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ६८ विषय क्रमांक : २१
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – वाहतुक
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वाहतुक/स्था/१/कावि/१८६/२०१३,दि.५/९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड रेल्वे स्टेशन परिसरात/नागरिकांना सुरक्षीत रस्ता ओलांडणेसाठी सुविधा तयार करणेकामी र.रु. ११,२५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६९ विषय क्रमांक : २२
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – वाहतुक नियोजन कक्ष
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.वाहतुक/स्था/१/कावि/३२/२०१३,दि.७/८/२०१३

मा. सह शहर अभियंता महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क प्रभागात दापोडी परिसरातील रस्त्यावर व चौकामध्ये वाहतुक सुधारणा विषयक कामे करणेकामी र.रु. ९,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७० विषय क्रमांक : २३
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – बीआरटीएस स्थापत्य
सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.नितीन काळजे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र/का.अ/बी.आर.टी.एस/६२४/२०१३,दि.५/९/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

देहु आळंदी रस्त्याचे साखळी क्रं. ८/२५० ते १५/२५० किमी मधील रस्ता रुंदीकरण व मजबुतीकरण करणे अंतर्गत फुटपाथ बांधणे, पावसाळी पाण्याच्या पाईप लाईन टाकणे, पाणीपुरवठा व जलनि:सारणासाठी मोठया व्यासाच्या लाईन टाकणे, रस्ता दुभाजक बांधणे इ.कामे करणे आवश्यक आहे. सदर कामे IRC च्या मानांकाप्रमाणे करणेत येणार आहे. सदर उर्वरीत कामे करणेसाठी मनपाच्या चालु प्रचलित दरसुची २०१२ – १३ नुसार अंदाजपत्रक हे सदर कामाचे तांत्रीक सल्लागार मे.पेव्हटेक कन्स्लटंट यांनी तयार केले असुन त्यांची अंदाजपत्रकीय र.रु. ४४,३०,१५,५६२/- इतकी आहे. सदर काम करणेसाठी मनपाच्या सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विशेष योजना या लेखाशीर्षावर अ.नं.१०३ पानांक २९ वर र.रु. १०,००,००,०००/- तरतुद केली असुन त्यामधुन सदर काम करुन घेता येईल. सदर काम करणेकामी येणा-या र.रु. ४४,३०,१५,५६२/- च्या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७१ विषय क्रमांक : २४
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – क प्रभाग विद्युत
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/कप्र/७५२/२०१३,दि.२८/८/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी येथील लांडेवाडी चौकातील शिवसृष्टी प्रकल्पाचे उदघाटन नजिकच्या काळात, ना उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार यांचे हस्ते होणार असुन या परिसरात विद्युत विषयक कामे करणेबाबत मा.आमदार श्री विलास विठोबा लांडे यांनी दि. ८/८/२०१३ चे पत्रान्वये या विभागास कळविले आहे या पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे कामे करणेसाठी दि. ८/८/२०१३ व १२/८/२०१३ रोजी मा.कार्यकारी अभियंता (वि), मा.कार्यकारी अभियंता (स्था) समवेत मा.आमदारांची प्रत्यक्ष

Site Visit व चर्चेनुसार मा.कार्यकारी अभियंता (वि) यांचे सुचनेनुसार १) अश्वारुढ पुतळयाचे दोन्ही बाजुस १२.५ मी. उंचीचा हायमास्ट बसविणे व ३) लांडेवाडी चौकातील मेघडंबरी येथे लाईट फिटींग बसविणे ही दोन्ही कामे सुरु केली आहेत तसेच लांडेवाडी चौकातील शिवसृष्टी परिसरात फुटपाथवर दोन्ही बाजुने डेकोरेटीव्ह पोल व फिटींग (पुणे मनपाने शनिवारवाडयासमोरील पुलावर बसविलेले पोल व फिटींग प्रमाणे) बसविणेकामी सुचना केल्या आहेत त्यानुसार पुणे मनपा येथे भेट देऊन संबंधीत क. अ. श्री महानोर यांचेकडुन माहिती घेतली आहे सदरचे ठिकाणी पुणे मनपाचे C I casting pole 8 ft height व त्यावर Lantern type Casting fitting LED 60w बसविल्या आहेत पुणे मनपाच्या स्वीकृत दरानुसार संदर्भिय ठिकाणी करावयाचे कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता र.रु. १९५५६३०/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम लवकर होणेसाठी, या ठिकाणी सुरु असलेल्या नि. नो.क्र.११/१३ – २०१३/१४ (दर २३.९९% कमी) मे इलेक्ट्रो मेकॅनिक्स याचेकडुन करुन घेणे शक्य आहे, तथापि या कामामध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसलेने या कामास वाढीव प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे. या कामास मुळ प्रशासकीय मान्यता रु. २५ लाख आहे वाढीव (२० लाख) मान्यतेसह एकुण रु. ४३ लाख खर्च होणार आहे. सबब विषयांकित काम वरीलप्रमाणे नि.नो.क्र.११/१३ – २०१३ /१४ मधुन करणेस व त्याकामी होणारा खर्च २० लाख सह एकुण सुधारीत खर्च रु. ४३ लाख मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७२ विषय क्रमांक : २५

दिनांक : ०६/०९/२०१३

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.साधना जाधव

संदर्भ : मा.वैशाली काळभोर,मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव..

मा.महापालिका सन २०१३ - १४ चे अंदाजपत्रकामध्ये क प्रभागाचे पांजरपोळ येथे २.०० द.ल.लि. क्षमतेची आर.सी.सी. उंच टाकीचे संकल्पन करणे, बांधणे चाचणी देणे व कार्यान्वीत करणे या कामाचा समावेश पान क्र. ६९९/५६ येथे आहे. सदर कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७०,००,०००/- इतकी आहे. या कामासाठी र.रु. १,५०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे..सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७३ विषय क्रमांक : २६

दिनांक : ०६/०९/२०१३

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा. शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने सांगवी येथे ऐतिहासीक उद्यान निर्माण झाले आहे. सांगवी येथील स.नं.६ मधील स्वर्गीय तानाजीराव शितोळे (सरकार ) उद्यान (शिवसृष्टी) मध्ये उर्वरित काम करणेसाठी अंदाजपत्रक २०१३ – १४ मध्ये अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९० लाख इतकी असुन या कामासाठी तरतुद रक्कम रुपये ७५ लाख इतकी असल्याने व प्रत्यक्ष उद्यानाची

जागा १००% ताब्यात असल्याने तरतुदींचे रकमेच्या दुप्पट रकमेचे काम करणेस मान्यता व्हावी व अंदाजपत्रकीय रक्कम रु. २ कोटी पर्यंतचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/८४१/२०१३
दिनांक - १०/०९/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.